08-09-2026-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 07-09-2026 22:31 Page 1



## निवडक

### वाळके खून प्रकरणात शेखचा जामीन फेटाळला

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** सराफ स्वप्नील वाळके खून प्रकरणातील संशयित मुस्तफा शेख याचा जामीन अर्ज दक्षिण गोवा प्रधान जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळला. न्यायाधीश शर्मिला पाटील यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. सरकारी वकील एस. सामंत यांनी जामिनास विरोध केला. २ सप्टेंबर २०२० रोजी वाळके यांची गोळी झाडून व सुरीने भोसकून हत्या झाली होती. खटल्यात ११२ साक्षीदार असून, संशयिताविरुद्ध पुरेसे पुरावे असल्याचे सरकारी पक्षाने सांगितले.

### मडगावात आढळला अज्ञाताचा मृतदेह

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** येथील गांधी मार्केट परिसरात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला. मृत व्यक्ती अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगटातील असून, पोलिस चौकशीत तो हमाल असल्याचे तसेच त्याला दारूचे व्यसन होते व तो गांधी मार्केट परिसरातील फुटपाथवर झोपत असल्याची माहिती मिळाली. अनैसर्गिक मृत्यू म्हणून मडगाव पोलिसांनी हे प्रकरण नोंदवून घेतले आहे. मृतदेह दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवला आहे.

### शिवोली येथे ८ रोजी विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ७ :** येथील सार्वजनिक गणेश विश्वस्त मंडळात श्रावणी मंगळवारनिमित्त ८ रोजी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यजमान दिलीप डुमरसकर यांच्या यजमानपदाखाली हा कार्यक्रम होणार आहे. या निमित्त सकाळी अभिषेक, दुपारी आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७.३० वाजता अभंग, भावगीत, भक्तिगीत व नाट्यगीतांचा कार्यक्रम होणार आहे. यात गायक अर्णव बुवा व गार्गी सिद्धया सहभागी होणार असून, हार्मोनियमवर दत्तराज मुर्लेकर, तबल्यावर संकेत खलप, पखवाजवर किशोर तेली, तर मंजिऱ्यावर बाहुल खांडोळकर साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन मानसी चाळवे करणार आहेत.

### पेडण्यातील २५ जणांना कदंममध्ये नोकऱ्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** मतदारसंघातील नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, कदंब वाहतूक महामंडळात चालक आणि वाहकपदी म्हणून नियुक्ती झालेल्या २५ जणांना आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. या नियुक्त्यांसाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, वाहतूकमंत्री माविन गुदिन्हो आणि कदंब वाहतूक महामंडळाचे अध्यक्ष उल्हास तुयेकर यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता. त्यांच्या सहकार्यामुळे युवकांना रोजगाराची संधी मिळाल्याबद्दल आर्लेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तोरसे जिल्हा पंचायत सदस्य राघोबा कांबळी, मोपा सरपंच सुबोध महाले, तोरसेचे माजी सरपंच सूर्यकांत तोरस्कर, संजना परब, माजी नगराध्यक्ष तृप्ती सावळ देसाईल विनिता मांजरेकर, विर्नोडाच्या सरपंची स्वाती मालपेकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

आमदार आर्लेकर म्हणाले की, रोजगार हा युवकांच्या भवितव्याशी निगडित महत्त्वाचा विषय आहे. पेडणे मतदारसंघातील युवकांना भविष्यातही उपलब्ध रोजगाराच्या संधींचा लाभमिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार आहोत. यावेळी आर्लेकर यांनी राज्य सरकारच्या 'गोवा उज्वल' गॅस योजनेचाही उल्लेख केला.

### नेसाय येथे नाल्यात पडून युवकाचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड

**राय, दि. ७ :** नेसाय येथील मुगाळी परिसरात शनिवार दि. ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमाराला ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह नाल्यात आढळून आला. मयताचे नाव चंचल कुमार (वय ३०) असे असून तो हरियाणातील फरिदाबाद येथील असल्याची माहिती पोलिसांनी दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणी केल्यानंतर नाल्यात आढळलेली व्यक्ती चंचल कुमार असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत तो हे दारुच्या नशेत स्कूटर घेऊन गेला अशी माहिती समोर आली आहे. तो नाल्यात कसा पडला याबाबत पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेत अपघात झाला की अन्य काही कारणामुळे त्यांचा मृत्यू झाला, याबाबतही पोलिसांकडून तपास केला जात आहे. शवविच्छेदनानंतर मृत्यूचे कारण डोक्याला झालेली दुखापत आणि चिखलाचे पाणी श्वसनमार्गात गेल्यामुळे श्वास रोखला असल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे. मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. उपनिरीक्षक सागर कामत या प्रकरणी पुढील तपास करीत आहेत.

### पणजीत मटका घेताना एका संशयितास अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** शहरातील मार्केट परिसरात बेकायदेशीरपणे लोकांकडून मटका जुगार आणि बेटिंग स्वीकारणाऱ्या एका संशयिताला पणजी पोलिसांनी शनिवारी संध्याकाळी धडक कारवाई करत रंगेहाथ अटक केली.
पणजी बाजारपेठेत हा बेकायदेशीर धंदा सुरु असल्याची खात्रीलायक माहिती पणजी पोलिसांना मिळाली – होती. त्यानुसार पथक तयार करून – ही कारवाई करण्यात आली.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पणजी मार्केटमधील एका कोपऱ्यात जाहीरपणे मटका जुगाराचे आकडे लिहून लोकांकडून पैसे गोळा केले जात असल्याची माहिती पणजी पोलिसांच्या पथकाला खबऱ्याकडून मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या तयार केलेल्या खास पथकाने बाजार परिसरात अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान संशयित आरोपीला मटका घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी गोवा अग्रेसर

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह 'प्रेसिडेंट्स कलर' प्रदान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ७ :** देशात आकारमानाच्या दृष्टीने गोवा छोटा असला तरी राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने गोव्याचे महत्त्व मोठे आहे. सुरक्षित शहरे, सुरक्षित समाज आणि सागरी सीमांचे संरक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी गोवा पोलिसांनी प्रभावीपणे पार पाडली असून, राष्ट्रीय सुरक्षेतही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

गोवा पोलिसांच्या उल्लेखनीय सेवेला गौरवित अमित शहा यांच्या हस्ते पोलिस दलाला प्रतिष्ठेचा 'प्रेसिडेंट्स कलर' प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक, विधानसभा अध्यक्ष डॉ. गणेश गावकर, आरोग्यमंत्री विश्वजित राणे, वाहतूकमंत्री माविन गुदिन्हो, सार्वजनिक बांधकाममंत्री दिगंबर कामत, राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे, मुख्य सचिव डॉ. व्ही. कंदवेलू आणि पोलिस महासंचालक अलोक कुमार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

पोलिस दलाने अनेक वर्षे बजावलेली सेवा, शिस्त, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. गोवा हे देशातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असून, राज्याला मोठी सागरी सीमा लाभली आहे. त्यामुळे नागरिकांसह पर्यटकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि किनारपट्टीचे संरक्षण या क्षेत्रांत गोवा पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरते. या सर्व जबाबदाऱ्या पोलिस दलाने सक्षमपणे पार पाडल्या असून, देशाच्या सुरक्षेलाही हातभार लावला असल्याचे शहा यांनी नमूद केले. गोवा पोलिसांना मिळालेला 'प्रेसिडेंट्स कलर' हा केवळ पोलिस दलाचा सन्मान नसून, राज्यातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावणाऱ्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याच्या सेवेला मिळालेली पावती आहे. या सन्मानामुळे पोलिस दलाचा आत्मविश्वास वाढून भविष्यातील आव्हानांना अधिक सक्षमपणे सामोरे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.

### गोव्याचा गौरव आणखी उजळला : सावंत

**मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी गोवा पोलिसांना 'प्रेसिडेंट्स कलर' मिळणे हा गोव्यासाठी ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगितले. पोलिस दलाच्या दीर्घकाळच्या सेवा, शिस्त, धैर्य आणि समर्पणाचा हा गौरव आहे. अमित शहा यांनी गोव्याचे वर्णन मातृभूमीच्या कपाळावरील बिंदी' असे केले होते. आता गोवा पोलिसांना हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळाल्याने गोव्याचा गौरव आणखी उजळला आहे, असे सावंत म्हणाले. गोवा पोलिसांच्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने नागरिकांच्या सुरक्षेसाठी केलेल्या योगदानाचा हा सन्मान असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

### सायबर फसवणूक रोखण्यासाठी एआय कॉल एजंट

**सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी गोवा पोलिसांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. १९३० सायबर फसवणूक हेल्पलाइनसाठी एआय आधारित कॉल एजंट सुरू करून गोवा पोलिसांनी इतर राज्यांच्या तुलनेत एक पाऊल पुढे टाकले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले. या सुविधेमुळे सायबर फसवणुकीच्या तक्रारींवर अधिक वेगाने कार्यवाही करण्यास मदत होणार असून, नागरिकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पोलिसांच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. या उपक्रमाबद्दल शहा यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि पोलिस महासंचालकांचे कौतुक केले. सायबर गुन्ह्यांचे वाढते आव्हान लक्षात घेता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचा गोवा पोलिसांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**
**गोवा पोलिसांना मिळालेला हा सन्मान राज्यातील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेला मिळालेली महत्त्वपूर्ण दाद असून, भविष्यात नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी अधिक सक्षमपणे पार पाडण्यासाठी त्यांना प्रेरणा देणारा ठरणार आहे.**

### न्यायसंहितेच्या अंमलबजावणीत गोवा दुसऱ्या क्रमांकावर

**नव्या फौजदारी न्यायसंहितांच्या अंमलबजावणीत गोवा पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून, काही महिने देशात अव्वल स्थान पटकावले होते. सध्या ९३.३८ टक्के कामगिरीसह गोवा पोलिस देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले. न्यायसंहितांच्या अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या नऊही निकषांवर गोवा पोलिसांनी दमदार कामगिरी केली आहे.**

# कोलवा क्रीक एक्सपिरियन्स प्रकल्प रखडला

■ टीम दैनिक हेराल्ड

- प्रलंबित प्रकरणामुळे काम रखडले
- पर्यटनमंत्री रोहन खंवटे यांची माहिती

**मडगाव, दि. ७ :** पर्यटन विभागाने स्पष्ट केले आहे की, केंद्र सरकारच्या 'स्वदेश दर्शन योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेले बहुतांश प्रकल्प एकतर पूर्ण झाले आहेत किंवा सध्या सुरू आहेत मात्र कोलवा खाडीशी संबंधित प्रकल्प एका प्रलंबित न्यायालयीन प्रकरणामुळे रखडला आहे.

मुरगावचे भाजप आमदार संकल्प आमोणकर यांनी विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना पर्यटनमंत्री रोहन खंवटे म्हणाले की, बहुतांश कामे पूर्ण झाली असून काही सुरू आहेत. 'कोलवा क्रीक एक्स्पिरियन्स हा एकमेव प्रकल्प राष्ट्रीय हरित लवादमधील प्रकरणामुळे लांबणीवर पडला आहे.


नियम-१३(१)(ए) पहा. फॉर्म नं.३

**कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी१)**

दुसरा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, मुंबई ४००००५
(पाचवा मजला), सिंधिया हाऊस, बॅलार्ड, मुंबई-४००००१
**Case No.: OA/668/2025**

**सदर कायद्याच्या कलम १९ पोटकलम ४ आणि कर्ज वसुली न्यायाधिकरण नियम १९९३ च्या नियम ५ च्या उपनियम २ए अंतर्गत समन्स**

**इंडियन बँक** **विरुद्ध** Exh. No.: 12
**श्री निलकंठ फूड्स अँण्ड एएनआर**
**प्रति, (१) श्री निलकंठ फूड्स**
डी/डब्ल्यू/एस/ओ-राजन पंड्या एच नं. ४६ बी
ईश्वर कृपा न्यू अंबिका पार्क सोसायटी
रैया रोड आलाप ग्रीन राजकोट अहमदाबाद, गुजरात-३६०००६

**(२) श्री राजन भूपेंद्र भाई पंड्या**
एच नं. ४६ बी ईश्वर कृपा न्यू अंबिका पार्क सोसायटी रैया रोड,
आलाप ग्रीन राजकोटसमोर गुजरात-३६०००६
एच नं ४६ बी ईश्वर कृपा न्यू अंबिका पार्क सोसायटी गल्ली क्रमांक २
रैया रोड आलाप ग्रीन सिटी राजकोट, गुजरात राजकोट, गुजरात-३६०००७
तसेच मु.
बी ३०३ ३रा मजला लँडस्केप शायर कारंजालेम पणजी गोवा दक्षिण गोवा, गोवा

**-: समन्स :-**

**ज्याप्रमाणे**
**ओए/६६८/२०२५ हा १७/०४/२०२६** रोजी माननीय पीठासीन अधिकारी/निबंधक यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध होता. तरी सदर कायद्याच्या कलम १९(४)च्या अंतर्गत सदर न्यायालयाने समन्स/ नोटीस जारी केली आहे. कर्ज रक्कम **रु. २८१२११३/-** च्या वसुलीसाठी तुमच्या विरुध्द ओए दाखल करण्यात आला आहे. (कागदपत्रांच्या प्रतींसह अर्ज जोडला आहे).
सदर कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्ही, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देशित केले जाते आहे की,
**१)** समन्स मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अर्जदारांचा अर्ज मंजूर का केला जाऊ नये याबाबत कारणे दाखवा.
**२)** ओए अर्जातील अनुक्रमांक ३ ए मध्ये नमुद केलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्तेचे तपशील देणे.
**३)** या अर्जाचा निकाल येईपर्यंत मुळ अर्जातील अनुक्रमांक ३ए मध्ये नमुद केलेली मालमत्ता अथवा इतर तपशिल दिलेली मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करण्यात येवू नये.
**४)** बोजा असलेली मालमत्ता आणि / किंवा ओए अर्जातील क्रमांक ३ए नमुद केलेल्या मालमत्ता तुम्हाला विक्री लीज किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करता येणार नाही.
**५)** सदर मालमत्तासंबंधीत काही व्यवहार केल्यास त्यांची विक्री रक्कम तुम्हांला सदर मालमत्तेवरील बोजा असलेल्या बँकेच्या खात्यात जमा करावा लागेल.
तुम्हाला लिखित स्टेंटमेंट (अर्जदाराला कॉपीसह) सादर करण्यासाठी निर्देशित करण्यात येत आहे. आणि **२५/११/२०२६** रोजी दुपारी **१२:१५ वाजता** रजिस्ट्रारसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहे असे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल.
**दि. २४/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी आणि या न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासहीत.**
**ठिकाण- पुणे** **रजिस्ट्रार, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई**


# आसाम-आयडीसी शिष्टमंडळाची गोवा-आयडीसीला भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

- संस्थात्मक संवाद व ज्ञानाची देवाणघेवाण



**पणजी, दि.७ :**औद्योगिक विकास व प्रशासनाच्या क्षेत्रातील ज्ञानाची देवाणघेवाण तसेच उत्कृष्ट कार्यपद्धतींची परस्पर देवाणघेवाण करण्याच्या उद्देशाने आसाम औद्योगिक विकास महामंडळ (आसाम आयडीसी)च्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने गोवा औद्योगिक विकास महामंडळाच्या (गोवा आयडीसी) कार्यालयास भेट दिली.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व आसाम-आयडीसीचे अध्यक्ष तपन कुमार गोगोई, उपाध्यक्ष नवदीप कलिता आणि संचालक अमिताभ बरुआ यांनी केले.

शिष्टमंडळाने गोवा-आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रविमल अभिषेक, आयएएस तसेच महामंडळाच्या इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

या संस्थात्मक संवादाचे आयोजन विविध अनुभवांची अर्थपूर्ण देवाणघेवाण करणे, तसेच गोवा-आयडीसीची संस्थात्मक रचना, प्रशासन पद्धती, औद्योगिक प्रोत्साहनासाठीच्या उपक्रम आणि उद्योग व गुंतवणूकदारांना सहाय्य करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या कार्यप्रणालींची माहिती जाणून घेण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते.

यावेळी गोवा-आयडीसीचे प्रशासन मॉडेल व संस्थात्मक सुधारणा, औद्योगिक प्रोत्साहन व व्यवसाय सुलभतेसाठीचे धोरणात्मक उपक्रम, महसूल निर्मिती व आर्थिक शाश्वततेच्या यंत्रणा, तसेच औद्योगिक भूखंडांचे वितरण धोरण आणि क्लस्टरआधारित औद्योगिक विकासासाठीची कार्यप्रणाली याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पारदर्शकता बळकट करणे, संस्थात्मक कार्यक्षमता सुधारणे आणि उद्योगकेंद्रित प्रशासकीय परिसंस्था विकसित करण्याच्या दिशेने गोवा-आयडीसीने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेण्याची संधीही आसाम-आयडीसीच्या शिष्टमंडळाला मिळाली.

भेटीबाबत बोलताना गोवा-आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अभिषेक म्हणाले, अशा प्रकारचे संस्थात्मक संवाद अत्यंत महत्त्वाचे आहेत.

### रुग्णवाहिका कारची धडक, २ जण जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७ :** पालये श्री शिरसाट देवस्थान नजीकच्या धोकादायक वळणावर १०८ रुग्णवाहिका व कार यांच्यात जोरदार धडक होऊन कारमधील चालक व त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाले. अपघातात दोन्ही गाड्यांचे अतोनात नुकसान झाले.

काल सकाळी नऊच्या सुमारास पालये वळणावर हा अपघात घडला. हरमल येथे पोहताना एकजण बुडाल्याची कॉल आल्याने केरी येथून रुग्णवाहिका हरमल धरणावर येत होती. तर कार (जीए ०२ जे ५८५१) हरमलहून आरोंदा येथे जात होती. मात्र, दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली.

या अपघातानंतर दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली. रुग्णवाहिका चालकाच्या म्हणण्यानुसार सायरन मोठ्या आवाजात वाजत होता. मात्र, वळणावर अचानक कार समोर आल्याने संधी मिळाली नाही. मात्र, कारला वाचविण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.


**ई-लिलाव सूचना**
**(भारतीय कर्जबुडवेगिरी आणि दिवाळखोरी बोर्ड(लिक्विडेशन प्रक्रिया) नियमने, 2026 च्या अनुसुची 1 खाली पारीत)**

**मेसर्स सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड साठी**

ही नोटीस, मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठ यांच्या **05** -जानेवारी **2024** रोजीच्या आदेशाद्वारे मेसर्स सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड (लिक्विडेशन होत असलेली एक) कंपनीच्या स्थावर मालमत्तांच्या ई-लिलावासंबंधी आहे. सदर लिलाव ई-लिलाव प्लॅटफॉर्म बांकनेट द्वारे खाली सही करणाऱ्याद्वारे घेतला जाईल जो **https://ibbi.baanknet.com/.** याद्वारे पाहता येईल.

| | |
|---|---|
| **ई-लिलाव तारीख व व वेळ** | दिनांकः **10** ऑक्टोबर **2026**<br>वेळ : दुपारी **12.00** ते संध्या. **5.00** (प्रत्येकी **5** मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) |
| **लिक्विडेटरकडे पात्रता कागदपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख** | **08** ऑक्टोबर **2026** |
| **लिक्विडेटरद्वारे पात्र एच-1 बोलीदाराची घोषणा** | **08** ऑक्टोबर **2026** |
| **पाहणीची तारीख व वेळ** | दि. **08** सप्टेंबर **2026** ते **08** ऑक्टोबर **2026**<br>वेळ : सकाळी **10.00** ते संध्या. **6.00** (लिक्विडेटरला पूर्वसूचना देऊन) |
| **ईएमडी आणि बोली अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ** | **08** ऑक्टोबर **2026** दुपारी **12.00**पर्यंत |

| मालमत्तांचा तपशील | राखीव किंमत (रु. त) | बायणा रक्कम ठेव (रु. त) | बोली वाढ रक्कम (रु.त) |
|---|---|---|---|
| **संच 1 :** **गट क्र. 213, पोस्ट वाघवाडी, तालुका वाळवा, जि. सांगली** येथील असलेली जमीन व बिल्डींग, प्लांट व मशीनरी आणि किरकोळ साहित्य | रु. **1,17,87,001/-** (रु. एक कोटी सतरा लाख सत्त्याऐंशी हजार एक फक्त) | रु.**11,78,700/-** (रु. अकरा लाख अठ्ठयाहत्तर हजार सातशे फक्त) | रु.**1,00,000/-** (रु. एक लाख फक्त) |
| **संच 2 :** **गट क्र. 678, पोस्ट आलास, तालुका-शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र** येथील जमीन व बिल्डींग, प्लांट व मशीनरी आणि किरकोळ मत्ता | रु. **19,84,757/-** (रु. एकोणीस लाख चौऱ्याऐंशी हजार सातशे सत्तावन्न फक्त) | रु. **1,98,475/-** (रु. एक लाख अठ्ठ्याण्णव हजार चारशे पंच्याहत्तर फक्त) | रु. **1,00,000/-** (रु. एक लाख फक्त) |
| **संच क्र. 3 :** **गट क्र. 251, गाव-कुटवाड, तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, महाराष्ट्र** येथील जमीन व बिल्डींग, प्लांट व मशीनरी आणि किरकोळ मत्ता | रु. **5,59,690/-** (रु. पाच लाख एकोणसाठ हजार सहाशे नव्वद फक्त) | रु. **55,969/-** रु. पंचावन्न हजार नऊशे एकोणसत्तर फक्त ) | रु. **20,000/-** (रु. वीस हजार फक्त) |

कर, शुल्के, चार्जेस, ड्यूटीज, ट्रान्सफर फीज, स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी फीज, प्रिमियम्स वगळून. वॉरंटीज आणि न्डेम्नीटीज साठी कोणतेही प्रतिनिधित्व करू नये.

**महत्वाचे :**
1. सदर ई-लिलाव जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे, तेथे जे जे काही आहे आणि कोणताही रिकोर्सशिवाय या तत्वावर मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार पीएसबी अलायन्स (सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अलायन्स) यांचेद्वारे घतला जाईल.
2. मत्ता, ऑनलाईन ई-लिलाव बोली प्रपत्रे, घोषणा व हमीपत्र नमुना, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसामान्य अटी व शर्ती तपशील असलेली संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया कागदपत्रे **https://ibbi.baanknet.com/.** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
3. इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेचे शीर्षक, लीज भाडे, देखभाल चार्जेस, काही असल्यास, स्थानिक कर देय रकमा इ. ची त्यांची स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी आणि औद्योगिक भूखंडच्या विक्रीवर लीज ट्रान्सफर चार्जेस काही असल्यास त्याचा खर्च सोसावा आणि त्यांच्या स्वतःच्या खर्चाने मालमत्तेची पाहणी करावी व स्वतःचे समाधान करावे. वर दिलेल्या मालमत्तांचा तपशील लिक्विडेटर व त्यांच्या सहकाऱ्यांना संपर्क करून प्रस्तावित बोलीदार पाहणी तपासणी करू शकतील.
4. इच्छुक बोलीदारांनी **https://ibbi.baanknet.com/** या पोर्टलवर त्यांच्या स्वतःच्या ई-वॅलेट थात्याद्वारे बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) जमा करणे आवश्यक आहे. लिलाव यशस्वीपणे पूर्ण झाल्यावर सर्वोच्च बोलीदाराची ईएमडी आयसीआयसीआय बँक लिमिटेड, डी-१६, पीव्हीआर सिनेमाजवळ, प्रशांत विहार, नवी दिल्ली-**110085**, भारत, खाते क्र. **082705002103**, आयएफएससी कोड : आयसीआयसी**0000827** येथे असलेल्या सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड लिक्विडेशनमधील, या खात्यात हस्तांतरित केली जाईल.
5. जर, ई-लिलावाच्या शेवटच्या क्षणाच्या शेवटच्या **5** मिनिटांत एकादी बोली लावली गेल्यास, अंतिम वेळ अमर्यादित विस्तारासह **5** मिनिटांनी स्वयंचलित रितीने वाढवली जाईल.
6. इच्छुक बोलीदारांनी कर्जबुडवेगिरी आणि दिवाळखोरी अधिनियम, **2016** च्या कलम **29** ए खाली कोणत्याही अपात्रतेपासून त्यांस धोका नाही असे एक हमीपत्र सादर करावे. जर कोणत्याही टप्प्यावर, बोली सादर करण्यास बोलीदार अपात्र असल्याचे आढळल्यास, अशा बोलीदाराने जमा केलेली ईएमडी जप्त केली जाईल.
7. यशस्वी बोलीदाराची ईएमडी मालमत्तांच्या काही भाग विक्री विचारात घेण्यासाठी राखून ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी कोणत्याही व्याज, बँक चार्जेस व अन्य कोणत्याही चार्जेस शिवाय परत केली जाईल.
8. यशस्वी बोलीदाराने लिलावात ठेवलेल्या मालमत्तांच्या संबंधित लागू स्टॅम्प ड्युटीज/लीज ट्रान्सफर चार्जेस, फीज इ. आणि सर्व स्थानिक कर, ड्युटीज, रेट्स, असेसमेंट चार्जेस, फीज इ. टा खर्च सोसावा.
9. यशस्वी बोलीदाराने विक्रीच्या नोंदणीच्या हेतूकरिता संबंधित उपनिबंधकाकडून वेळ घ्यावी व त्याची व्यवस्था करावी.
10. सदर विक्री कर्जबुडवेगिरी आणि दिवाळखोरी अधिनियम, **2016** आणि त्याखालील लिक्विडेशन नियमनांच्या तरतुदींना लागू होईल.
11. हे स्पष्ट करण्यात येते की, **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi** या संकेतस्थळावर उपलब्ध ई-लिलाव प्रक्रिया दस्तावेज सादर केल्यानंतर, इच्छुक बोलीदार लिलावातील मालमत्तांच्या संबंधी डेटा घेण्यासाठी व जागेवरील पाहणी करण्यासाठी पात्र ठरतील.
12. विक्रीची उर्वरित रक्कम नेफ्ट/आरटीजीएस द्वारे लिवा संपल्याच्या तारखेपासून **90** दिवसांच्या आत जमा करावी. कृपया नोंद घ्यावी की, लिलाव संपल्यापासून **30** दिवसांत उर्वरित रक्कम जमा केल्यास त्यावर कोणतेही व्याज लागू होणार नाही. **30** दिवसांनंतर उर्वरित रकमेवर **12%** दराने व्याज आकारले जाईल जर लिलाव संपल्याच्या पासून **90** दिवसांचे आत ती अदा केल्यास सदर व्याज लागू होईल.
13. सदर रक्कम पुढील खात्यात जमा करावी : सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड लिक्विडेशनमधील, आयसीआयसीआय बँक लिमिटेड, डी-**16**, पीव्हीआर सिनेमाजवळ, प्रशांत विहार, नवी दिल्ली-**110085**, भारत, खाते क्र. **082705002103**, आयएफएससी कोड : आयसीआयसी**0000827**.

**सही/-**
**राकेश कुमार जिंदाल**
**मेसर्स इफीकॅक्स रिसोल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने,**
**सिद्धार्थ नॅचरल फूड रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे लिक्विडेटर,**
**आयबीबीआय नोंदणी क्र. : IBBI/IPE-0153/IPA-3/2023 24/50063**
**आयबीबीआय नोंदणीकृत पत्ता : युनिट क्र. 4,**
**1 ला मजला, ईश्वर कॉलनी, भामा शहा मार्ग, दिल्ली-11009**
**एएफए या पर्यंत वैध : 31.12.2026**
**प्रोसेस ईमेल आयडी : liq-sidnatural@gmail.com**
**दूर.क्र. 9560464525**


# 'ओंकार'चे मोपा-तांबोसे परिसरात पुन्हा आगमन

- शेतकरी भयभीत
- केळी-कवाथे उद्ध्वस्त करण्यास सुरुवात
- कायमस्वरूपी बंदोबस्ताची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ७ :** गणेश चतुर्थीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाच 'ओंकार'चे रविवारी, पुन्हा मोपा-तांबोसे परिसरात आगमन झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हत्तीने परिसरातील केळी व कवाथे पिकांचे नुकसान करण्यास सुरुवात केल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. चतुर्थीच्या काळात तो याच परिसरात ठाण मांडून राहिल्यास बागायती आणि शेतीचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

गेल्या वर्षापासून 'ओंकार' हत्तीचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. मात्र, अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. ओंकारला सुरक्षितपणे पकडणे, स्थलांतरित करणे किंवा त्याच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी वनखात्याने कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी होत आहे.

गोवा-महाराष्ट्र सीमेवर हत्तीची हाकलपट्टी

सध्या 'ओंकार'चा वावर गोवा-महाराष्ट्र सीमाभागात सुरू आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, हत्ती महाराष्ट्राच्या हद्दीत गेल्यानंतर त्याला गोव्याच्या दिशेने हाकलण्याचा प्रयत्न होतो, तर गोव्यात आल्यानंतर पुन्हा महाराष्ट्राच्या दिशेने पाठविले जाते. त्यामुळे या हत्तीची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जणू 'फुटबॉलसारखी' हाकलपट्टी सुरू असल्याची नाराजी शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकारामुळे समस्या सुटण्याऐवजी हत्ती पुन्हा-पुन्हा सीमाभागात परतत असून त्याचा फटका शेतकऱ्यांनाच बसत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. केवळ नुकसान झाल्यानंतर भरपाई देण्यापेक्षा हत्तीच्या वारंवार होणाऱ्या उपद्रवावर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले.


**पंजाब नैशनल बैंक** भारत सरकारचा उपक्रम **pnb punjab national bank** (A Govt. of India Undertaking)

**मडगाव शाखा : पंजाब नॅशनल बँक, १ ला मजला, ज्योती प्लाझा, ईसीडोरीओ बिपिस्ता रोड, पाजी फोंड, मडगाव, गोवा-४०३६०१, ईमेल : bo107810@pnb.bank.in**

**जाहीर नोटीस**

**पंजाब नॅशनल बँक, शाखा कार्यालय : मडगाव, १ ला मजला, ज्योती प्लाझा, ईसीडोरीओ बिपिस्ता रोड, पाजी फोंड, मडगाव, गोवा-४०३६०१, ईमेल : bo107810@pnb.bank.in** येथे स्थित खालील लॉकर धारकांकडून लॉकरचे भाडे देय आहे आणि त्यांनी ते भरलेले नाही, म्हणून त्यांना सूचना देण्यात येत आहे. खालील नमूद लॉकर धारकांना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर अनेक नोटीसा पाठविल्या आहेत. परंतु त्या नोटीसा वितरीत झाल्या नाहीत / परत आल्या आहेत. लॉकर धारकांनी खाली नमूद दिनांकापासून लॉकर भाडे दिलेले नाही. सदर नोटीसीने लॉकरधारकांना शेवटची संधी दिली जात असून नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ९० दिवसांच्या आत लॉकरचे भाडे जमा करावे. अन्यथा बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँक सदर लॉकर्स उघडेल.

| अ. क्र. | लॉकर नं. आणि लॉकर धारकाचे नाव | लॉकर धारकाचा उपलब्ध अंतिम पत्ता | जारी करण्याची तारीख / थकित भाडे ---पासून / एकूण थकित भाडे (रूपयांत) | पहिल्या नोटीसीचा दिनांक / दुसऱ्या नोटीसीचा दिनांक / अंतिम नोटीसीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | **लॉकर नं. : EE180 गजानन थोरात** | त्रिमूर्ती निवास, मुरीदा, फातोर्डा, सालसेटे गोवा, मडगाव-४०३६०२ | १४/११/२००८<br>०१/०४/२०२२<br>रू. १५,०६८/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |
| २. | **लॉकर नं. : AB00109M1 पॉला स्टेफनी एस सोरेश** | एच नं. २१०, कांटेवाड्डो, तेलोलियम, नावेलिम, सालसेटे गोवा, मडगाव-४०३७०७ | ०८/०१/२००६<br>०८/०१/२०२३<br>रू. ५२५०/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |
| ३. | **लॉकर नं. : BB124 मनिषा शर्मा** | लक्ष्मी अपार्टमेंट, दुकान नं. ४, सेंट जोकीम रोड बोर्डा, मडगाव-४०३६०१ | २८/०१/२०११<br>०१/०४/२०२०<br>रू. ८५००/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |
| ४. | **लॉकर नं. : CC121 शर्मिला पालयेकर आणि विनोद पालयेकर** | डॉन-जोएओ भागीरथी निवास, मर्सेस गोवा, मडगाव-४०३६०१ | १७/०३/२००८<br>०१/०४/२०२२<br>रू. १३०००/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |
| ५. | **लॉकर नं. : Cc135 ईगोजी सुथरकर कृष्णाजी राव** | डी-५७, २रा मजला, जनता को-ऑप हौ. सोसा. एचडीएफसी बँकेजवळ, आकेम, मडगाव-४०३६०१ | २१/०३/२०१३<br>०१/०४/२०२०<br>रू. २४,५३३/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |
| ६. | **लॉकर नं. : CC95 केदार मॅपसेन्कर** | २१३, कोंबा मडगाव, मडगाव-४०३६०१ | १६/०५/२०१४<br>०१/०४/२०२१<br>रू. १३,५६६/- | १९/१०/२०२४<br>२३/०४/२०२५<br>२०/०५/२०२६ |

**दिनांक : ०८/०९/२०२६**
**ठिकाण : गोवा**
**पंजाब नॅशनल बँक, अधिकृत अधिकारी, शाखा ऑफिस, मडगाव, गोवा**